हात हातात...

बोललो ते नाही, मनातले खुलुनी
वेळ नको आता, सांग ते डोळ्यातूनी
गंध तुझा बहरू दे, माझ्या अंतरात ।। १ ।।

क्षण हा ही जाईल, पुन्हा फिरुनी
वाट गवसली किती, गं युगातुनी
आता नको अडखळू, शब्दांशब्दात ।। २ ।।

रात्र बघ येईल, आता भरुनी
मोगऱ्याचा गंध, श्वासात गुंफूनि
चांदण्यांच्या सावलीला, हात हातात ।। ३ ।।

www.saarthbodh.com
© सपु

- सचिन कुलकर्णी